कोषागारातून रोख देय अनुदान

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी सवर्साधारण घटकासाठी केंद्र हिश्श्याचे अनुदान वितरीत करण्याबाबत...(२२१५ ९९८९)

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांक: राग्रापे-२०१६/प्र.क्र.४४/पापु-१०
सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई-४०० ००१.
दिनांक: ०३ मार्च, २०१८

वाचा-

१) शासन निर्णय क्रमांक: पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-७, दिनांक १७ मार्च, २०१०.
२) केंद्र शासनाचे पत्र क्र.W-११०२०/२०८/२०१५-Water-I/२६४, दिनांक १७.३.२०१७.
३) केंद्र शासनाचे पत्र क्र.W-११०२०/६६/२०१५-Water-I/२७०, दिनांक २३.३.२०१७.
४) संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांचे पत्र क्र. पा.व स्व.स.सं./लेखा/०८/प्र.क्र.-०२/२०१८/१६४, दिनांक २०/०१/२०१८.

प्रस्तावना-

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम या केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाकडून सर्वसाधारण घटकासाठी प्राप्त झालेल्या केंद्र हिश्श्याच्या अनुदानांतर्गत आर्थिक वर्ष-२०१७-१८ मध्ये मागणी क्र. वाय-०२, लेखाशिर्ष २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता, १०२ ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम, ०२ जिल्हा परिषदांना योजनांतर्गत अनुदाने, (०२) (३०) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम सहाय्यीकृत बाबी व पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षणासाठी अर्थसहाय्य (केंद्र हिस्सा) यासाठी अनुदाने, ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (२२१५ ९९८९) या लेखाशिर्षाखाली सहाय्यीकृत बाबी या घटकासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात केंद्र शासनाकडून उपरोक्त वाचा येथील २) व ३) अन्वये प्राप्त झालेला निधी राज्याच्या एकत्रित निधीत आर्थिक वर्षाच्या अखेरीस दिनांक ३० मार्च, २०१७ रोजी जमा झाल्याचे वित्त विभागाने अभिप्राय दिले आहे. सदरचा निधी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात अखेरीस प्राप्त झालेला परंतू अखर्चित राहीलेला निधी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई यांना सर्वसाधारण घटकांतर्गत अनुदान मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय-

२. आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये नळ पाणी पुरवठा योजनेकरीता उपरोक्त घटकांसाठी २२१५ ९९८९ या लेखाशिर्षाखाली रु. ११,५८,७१,०००/- (अक्षरी रुपये- अकरा कोटी अठ्ठावन्न लक्ष एकाहत्तर हजार मात्र) एवढे अनुदान सहाय्यीकृत बाबी यासाठी सर्वसाधारण घटकांतर्गत संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई यांना अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर (BEAMS) मंजूर व मुक्त करण्यात येत आहे.

अटी-

१) संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, यांनी हे अनुदान राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत हाती घेतलेल्या ५५५ भौतिक दृष्ट्या पूर्ण परंतु आर्थिक दृष्ट्या अपूर्ण गावे/वाड्यातील योजना पूर्ण करण्यासाठी खर्च करावयाचे आहे. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, यांनी सदर अनुदान खर्च करतांना फ्लोराईड/आर्सेनिकग्रस्त गावे/वाड्यामधील योजना, संसद आदर्श ग्राम योजनेमधील गावातील योजना, हागणदारीमुक्त गावातील योजना पूर्ण करण्यासाठी प्राथम्याने खर्च करण्यात यावे.

२) सदर अनुदान सहाय्यकृत बाबी यासाठी सर्वसाधारण घटकांतर्गत पाणी पुरवठा योजना राबविण्यासाठी या घटकाच्या निश्चित वार्षिक कृती आराखड्यात उपरोक्त घटकांसाठी समाविष्ट असलेल्या गावे/वाड्यामधील प्राथम्यक्रमानुसार येणाऱ्या गावे/वाड्यांमधील योजनांची कामे तसेच ज्या केंद्रीय सहाय्यित योजनांमध्ये शासन सहभाग सक्तीचा करण्यात आलेला आहे अशा भौतिक दृष्ट्या पुर्णत्वाकडे आलेल्या योजनांची कामे पूर्ण करण्यासाठी प्राथम्याने खर्च करावयाचे आहे.

३) संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, यांनी या अनुदानातून केलेल्या खर्चाचे स्वतंत्र लेखे ठेवावेत. या शासन निर्णयातील अटी व शर्तीची व NRDWP या योजनेंतर्गत केंद्र शासनाने घालून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांची संबंधित अंमलबजावणी यंत्रणांकडून पूर्तता होत आहे, याची शासनाला खात्री करून घेता यावी, यासाठी महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर यांना तसेच या विभागातील प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांना लेखा परीक्षणाकरिता संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, कार्यालयाची पुस्तके व लेखे पाहण्याचा अधिकार राहील. तसेच महालेखापाल यांना त्यांचे काम योग्यरितीने पार पाडता यावे म्हणून संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, संपूर्ण मदत व सुविधा पुरवतील.

४) शासन परिपत्रक ग्रामविकास विभाग क्र.आरसीएन-१८९/सी.आर.३०२७/२८, दि. ५/९/९० मधील सुचनेप्रमाणे सदर अनुदानाच्या खर्चाचा महालेखापालकार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालावा व ताळमेळाचे अहवाल विहित दिनांकांना संबंधित अंमलबजावणी यंत्रणांनी विभागीय आयुक्त,(विकास शाखा) यांना व कार्यासन पापु-१०/पापु-२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सादर करावे. त्याचप्रमाणे उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापाल कार्यालय, मुंबई/नागपूर व पापु-१० कार्यासनास सादर करावे.

५) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार रासायनिक बाधित (केमीकल कन्टोमेशन) यासाठी सर्वसाधारण घटकांतर्गत पाणी पुरवठा योजना राबविण्यासाठी याखाली हाती घेतलेल्या योजनांसाठीचा खर्च हा ५०% केंद्र निधीतून व ५०% राज्य निधीतून करणे आवश्यक आहे.

६) केंद्र व राज्य हिश्श्यातून केलेल्या खर्चाची नोंद न चुकता,IMIS या प्रणालीवर पुढीलप्रमाणे घेण्यात यावी तसेच सदर नोंदी पुढीलप्रमाणे वेळोवेळी अद्ययावत करण्यात याव्यात.

क. भौतिक दृष्ट्या १००% पूर्ण परंतु आर्थिक दृष्ट्या अपूर्ण योजना.
ख. >७५ ते < १००% भौतिक दृष्ट्या पूर्ण.
ग. >५० ते ७५%< भौतिक दृष्ट्या पूर्ण.
घ. >२५ ते ५०%< भौतिक दृष्ट्या पूर्ण.

७) सर्वप्रथम, राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना यापूर्वी उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीमधून ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी करण्यात आलेला सर्व खर्च प्रथम आयएमआयएस प्रणालीवर अद्यावत करण्यात यावा.

८) सदर निधी सन २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५, २०१६-१७ या वर्षाच्या कृती आराखड्यात समाविष्ट असलेल्या गावांच्या योजनांसाठीच खर्च करावा. तसेच उपलब्ध करून देण्यात आलेला निधी उपयोगात आणण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखून खर्चाचे नियोजन करावे व उपयोगिता प्रमाणपत्रे शासनास वेळीच सादर करावीत.

३. केंद्र शासनाकडून वरील घटकांसाठी प्राप्त झालेली रु. ११,५८,७१,०००/- एवढी रक्कम आहरण व संवितरण अधिकारी (रोख शाखा), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे BEAMS प्रणालीवर वितरीत करण्यात येत आहे. सदर रक्कम रु. ११,५८,७१,०००/- (अक्षरी रुपये-अकरा कोटी अठ्ठावन्न लक्ष एकाहत्तर हजार मात्र) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई यांच्या कार्यालयातून आहरीत करण्यासाठी (श्री. का. जा. धलपे), आहरण व संवितरण अधिकारी तथा अवर सचिव(रोख शाखा), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. सदर रक्कम (श्री. का. जा. धलपे) आहरण व संवितरण अधिकारी तथा अवर सचिव (रोख शाखा), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी अधिदान व लेखाधिकारी, मुंबई यांच्या कार्यालयातून आहरीत करुन ती पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या बँक खात्यात जमा करावी व तद्नंतर स्वतंत्र धनादेशाद्वारे रक्कम पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई यांच्या बँक खात्यात जमा करावी, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांनी सदर रक्कम केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार तसेच राज्य शासनाने या संदर्भात वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार खर्च करावी.

४. यावर होणारा खर्च मागणी क्र. वाय-०२, लेखाशिर्ष २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता, १०२ ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम, ०२ जिल्हा परिषदांना योजनांतर्गत अनुदाने, (०२) (३०) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम सहाय्यीकृत बाबी व पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षणासाठी अर्थसहाय्य (केंद्र हिस्सा) यासाठी अनुदाने, ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (२२१५ ९९८९) या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व तो सन २०१७-१८ साठी मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३,दिनांक ३०.०६.२०१७ अनुसार प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे. सदर प्रकरणी वित्त विभाग परिपत्रक दि. १८.०४.२०१७ मधील अनुक्रमांक ७ ते १८ येथील अटींची तसेच सदर परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील क्र. ३ व ९ येथील बाबींची पुर्तता होत आहे.

६. सदर शासन निर्णय वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र १४५/व्यय-३, दिनांक २०.०४.२०१७ व क्र. १६४/व्यय-१८, दिनांक ०२.०५.२०१७ च्या मान्यतेने व सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र २०१८०३०३१४१३०३९६२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Deelip Pandurang Patil

Digitally signed by Deelip Pandurang Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3810fd2c32f3841df60ca68a27ae50fdbc9fd6c506fd334325871d684bf3eef9, cn=Deelip Pandurang Patil
Date: 2018.03.03 13:54:25 +05'30'

(दिलीप पां.पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई(लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
२. महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर(लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
३. नियोजन विभाग (कार्यासन-१४४३)/वित्त विभाग(व्यय-३), मंत्रालय, मुंबई.
४. सर्व विभागीय आयुक्त,
५. उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पाणी व स्वच्छता) सर्व जिल्हा परिषदा
६. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई.
७. संचालक, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
८. जिल्हा कोषागार अधिकारी,
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई.
११. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील कार्यासने क्र. पा.पु.४, पा.पु. २०